प्रेस नोट दि. ०९/११/२०२१

**मुंबईसह महाराष्ट्रभर १०० पेक्षा जास्त महागडी वाहने व वाहनांच्या काचा फोडून सोने, मोबाईल, लॅपटॉप चोरी करून गेल्या सहा वर्षापासून धुमाकूळ घालणाऱ्या व पोलीसांना गुंगारा देवून पसार होणाऱ्या अट्टल गुन्हेगारास व त्याच्या साथीदारांना गुन्हे शाखेच्या, कक्ष - ७ ने शिताफीने जेरबंद केले.**

| | |
|---|---|
| कक्ष | गुन्हे प्रकटीकरण शाखा, युनिट-७, घाटकोपर |
| गु.र.क्र. व कलम | गु.प्र.शा. गु.र.क्र. ८३/२०२१ कलम ३७९, ४२७,४११,३४ भादवि सह कलम ४, २५ भाहका सह कलम ३७ (१), १३५ मपोका,सह कलम ६६(क), ६६(ड) आयटी ॲक्ट (विक्रोळी पोलीस ठाणे गु.र.क्र. ५८७/२०२१ ) |
| गुन्हा दाखल दिनांक | दि.२२/०८/२०२१ रोजी ०७.५० वा., विक्रोळी पो.ठा.दै. क्र. १५/२०२१ |
| गुन्हा घडला, दिनांक व वेळ | दि. २२/०८/२०२१ रोजी ०५.४५ वा. ते ०७.३० च्या सुमारास |
| घटनास्थळ | ठाणे मुंबई वाहीनी सर्व्हिस रोड, जेव्हीएलआर ब्रिज जंक्शनच्या जवळ, विक्रोळी पुर्व, मुंबई. |
| आरोपींची संख्या | ०३ |
| जप्त मुद्देमाल व अंदाजे किंमत | १) महिंद्रा XUV ५०० अं.किं.रू. १३,००,०००/-<br>२) इनोव्हा मोटार कार अं.किं.रू. ९,००,०००/-<br>३) होंडा सिटी मोटार कार अं.किं.रू. २,५०,०००/-<br>४) मोबाईल, कॅमेरे, सोन्याची चैन व चांदीचा कडा अं.किं. १,३६,०००/-<br>५) रोख रक्कम रू. ८०,०००/-<br>६) वेगवेळया बॅकांची क्रेडीट/डेबिट कार्ड, चेक्स्, ३० ते ३५ वाहनांचे आर. सी. बुक्स्, महत्वाची कागदपत्रे, शासकिय ओळखपत्रे, मेट्रो कार्ड, इंडीयन रेल्वेचे कार्ड, तलवार, काच फोडण्याची हत्यारे, मारहाण करण्याची हत्यारे, बनावट नंबर प्लेट, मोबाईल सिमकार्ड, मेमरीकार्ड, लॅपटॉप, टॅब्स, आयपॉड, कॅमेरे व लेन्स, ॲपल घडयाळ इत्यादी.<br>**अशी एकूण हस्तगत मालमत्ता अं.किं.रू. २६ लाख ६६ हजार**. |

**थोडक्यात हकिकत :-**

दि. २२/०८/२०२१ रोजी पूर्व द्रुतगती मार्ग, ठाणे-मुंबई वाहिणी सर्विस रोड, जे.व्ही.एल.आर. ब्रीज जंक्शन जवळ, विक्रोळी पुर्व, मुंबई या ठिकाणी पार्क केलेल्या एकूण ०५ कारच्या काचा फोडुन कार मधील २,४४,५००/- रूपयांच्या मालमत्तेची चोरी झाल्याबाबत विक्रोळी पोलीस ठाणेस गुन्हा नोंद झाल्याबाबत या कक्षास माहिती प्राप्त झाली.

विक्रोळी पोलीस ठाणे, गु.र.क्र. ५८७/२०२१ कलम ३७९,४२७ भा.द.वि. या गुन्हयाच्या तपासाच्या अनुषंगाने गेले ०२ महिने सतत सी.सी.टी.व्ही. फुटेजची तपासणी तसेच संशयीत आरोपीताच्या मोबाईल क्रमांकाचा तांत्रीक विश्लेषण केले असता, सदर गुन्हयातील संशयित पाहिजे आरोपी हा दि. २८.१०.२०२१ रोजी पंतनगर बेस्ट डेपोच्या परीसरात आला असल्याचे निष्पन्न झाल्यानंतर प्र.पो.नि. श्रीधनकर यांचे मार्गदर्शनाखाली पथके तयार करून पंतनगर बेस्ट डेपोच्या परीसरात सापळा रचण्यात आला. संशयित पाहिजे आरोपी हा XUV 500 गाडी नंबर एम.एच १४ डी.एफ. ०६३९ मधुन पंतनगर बेस्ट डेपो च्या बाजुच्या गल्ली मध्ये, बेस्ट वसाहत गेटच्या बाजुला, घाटकोपर पुर्व, मुंबई या ठिकाणी आला असता, त्याला कौशल्यपूर्वक गाडीसह ताब्यात घेवुन कक्ष कार्यालयात आणले.

ताब्यातील इसमाकडे वर नमुद गुन्हयाबाबत सखोल चौकशी केली असता, त्याने नमुद गुन्हयाची कबुली दिली व त्याचे ताब्यातील XUV 500 हि गाडी चोरीची असल्याची त्याने माहिती दिल्याने त्याची अंगझडती व नमुद वाहनाची झडती घेतली असता त्यामध्ये वाहनांचे काच फोडून चोरी करण्याकरीता लागणारे मल्टीपर्पज पक्कड, स्कु ड्रायवर, कटर, फोल्डींग चाकू, फायटर मुठ, स्टील पट्टी, पान्हे, लॉक खोलण्याची पीन, स्टीलची स्केल पट्टी तसेच विविध वाहनांचे आर.सी. बुक, वेगवेगळया इसमांचे आय.सी.आय.सी.आय. /एच.डी.एफ.सी./ॲक्सीस/सिटी/इंडसइंड/स्टेट बॅक इत्यादी बॅकांचे डेबीट/क्रेडीट कार्ड, विविध बॅकेचे चेक्स, पोलीस/एस.आर.ए. अधिकारी/कक्ष अधिकारी/आयकर अधिकारी/वैद्यकीय अधिकारी/ उप विभागीय

अधिकारी यांचे आयकार्डस्, पेनड्राईव्ह, डिजीटल वॉच, वेगवेगळया गाडयांच्या चाव्या, वाहनांचे दोन नंबर प्लेट MH 46 AP 7423, इंडीयन आर्मीचे ओळखपत्र, विविध इसमांचे पॅनकार्ड/आधारकार्ड, इंडीयन रेल्वेचे स्मार्ट कार्ड, सॅमसंग कंपनीचे तीन मोबाईल, पोलीस मॅरेथॉनचा टॉवेल तसेच एक तलवार मिळून आल्याने ते सर्व जप्त करण्यात आले आहे. त्यानंतर सदरचा गुन्हा मा. वरिष्ठांचे आदेशाने गु.प्र.शा., गु.र.क्र. ८३/२०२१ अन्वये कक्ष-७ चे तपासावर घेण्यात आला असुन ताब्यातील इसमास सदर गुन्हयात अटक करण्यात आले आहे. त्यानंतर त्यास मा. न्यायालयात रिमांडकामी हजर केले असता मा. न्यायालयाने त्यास दि. ०९/११/२०२१ रोजी पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

नमुद आरोपीताची पोलीस कोठडी दरम्यान केलेल्या तपासादरम्यान सदर आरोपीताने सन २०१५ पासून अद्याप पर्यंत मुंबई, नवी मुंबई, ठाणे शहर, ठाणे ग्रामीण, नाशीक, पूणे शहर, पिंपरी-चिंचवड, रायगड या परिसरात सुमारे १०० पेक्षा जास्त गुन्हे करून मोबाईल, लॅपटॉप, टॅब्स, आयपॉड, कॅमेरे व लेन्स, मोटार कार, रोख रक्कम व इतर वस्तुंची चोरी केली असल्याची कबुली दिलेली आहे. सदर आरोपीकडून चोरी केलेल्या मोबाईल फोन व वस्तू विक्री करीता त्याच्या साथीदारास देत असल्याची कबुली दिल्यावरून त्यास उत्तर प्रदेश येथे पकडून नमुद गुन्हयात अटक करण्यात आले. तसेच चोरी केलेल्या मुद्देमालाची विल्हेवाट लावण्याकरीता त्याची खार येथे रहात असलेली पत्नी हिचा देखील गुन्हयात सहभाग निष्पन्न झाल्याने तीला नमुद गुन्हयात अटक करण्यात आले आहे.

नमुद आरोपीताकडून महिंद्रा XUV 500, इनोव्हा मोटार कार, होंडा सिटी या तीन गाडया हस्तगत करण्यात आलेल्या आहेत. तसेच एकूण ०७ वाहन चोरीचे गुन्हे (दादर पोलीस ठाणे, बि.के.सी. पोलीस ठाणे, जुहू पोलीस ठाणे, ताडदेव पोलीस ठाणे, मुंबई, वागळे इस्टेट पोलीस ठाणे, ठाणे शहर, एन.आर.आय. पोलीस ठाणे, नवी मुंबई, सातपूर पोलीस ठाणे नाशीक शहर.) उघडकीस आले आहेत.

**गुन्हा करण्याची पद्धत/मोडस :-**

चोरीची मोटार कार वापरुन त्यास बनावट नंबर प्लेट लावून, विवीध ठिकाणी पार्क केलेल्या वाहनांची रेकी करून वाहनांचे काच फोडून वस्तुची चोरी करणे. तसेच सदर आरोपीतास पोलीसांनी पकडण्याकरीता सापळा लावल्यास त्यांच्यावर ताब्यातील वाहन जोरात चालवून अंगावर घालण्याचा प्रयत्न करून सुसाट पळून जाणे.

तसेच चोरी केलेले डेबीट कार्ड व मोबाईल फोन वापरून ए.टी.एम./मोबाईल ॲप्लीकेशनव्दारे पिन रिसेट करून बॅंक खात्यातून पैसे काढणे. विक्रोळी पोलीस ठाणे गुन्हयात ०९ लाख रूपये ए.टी.एम. मधुन चोरले आहेत.

**अटक आरोपी :-**

१) एक पुरूष आरोपी, वय ३२ वर्ष, रा.ठी. बांद्रा पश्चिम, मुंबई व नालासोपारा(प.), जि. ठाणे
२) एक पुरूष आरोपी, वय ४५ वर्षे, रा.ठी. बहराईच,उत्तर प्रदेश.
३) एक महिला आरोपी, वय ३२ वर्ष, रा.ठी. बांद्रा पश्चिम, मुंबई.

सदरची यशस्वी कामगिरी मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे) श्री. मिलींद भारंबे, अपर पोलीस आयुक्त(गुन्हे) श्री. विरेश प्रभु, पोलीस उप-आयुक्त (प्रकटीकरण-१) श्री. निलोत्पल, सहाय्यक पोलीस आयुक्त(डि-पूर्व) श्री. नितीन अलकनुरे, **प्रभारी पोलीस निरीक्षक श्री. मनिष श्रीधनकर** यांचे मार्गदर्शनाखाली व महिला पोलीस निरीक्षक प्रिया थोरात, **पोलीस निरीक्षक श्री सुधीर जाधव** यांचे नेतृत्वाखाली **सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोगसिद्ध ओलेकर**, पोलीस उप निरीक्षक अतिश लोहकरे, माधवानंद धोत्रे, निलेश चव्हाण, **रामदास कदम**, स्वप्निल काळे, नामदेव परबळकर, पोलीस हवालदार दिपक पवार, संतोष गुरव, राजेंद्र शिंदे, प्रदिप बडगुजर, सुभाष मोरे, शशीकांत कांबळे, पोलीस नाईक गिरीश जोशी, विशाल शिंदे, विनोद पांडे, सचिन गलांडे, प्रमोद जाधव, गौरव सोनावणे, पोलीस शिपाई दिपक खरे, विकास होनमाने, महेश सावंत, जितेंद्र पाटील, गणेश पाटील, हिना शेख यांचेसह पोलीस नाईक चालक राजाराम कदम, दिलीपराव राठोड यांनी पार पाडली आहे.